**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ , अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त द्वितीय अपिल**

**अपिल क्र.१४२३ /२०११**
**१४२४/२०११**
जा.क्र.
दिनांक -

अर्जदार तथा अपिलकर्ता
कॅा.शरद केशवराव गोविंदवार
गांधीनगर, दिग्रस जि.यवतमाळ

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
यवतमाळ

२. जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था
दिग्रस जि.यवतमाळ

**(आदेश पारीत दिनांक ०५/०१/२०१२)**

**- निर्णय -**

वरील दोन्ही प्रकरणामध्ये अर्जदार तथा अपिलकर्ता एकच असुन जोडपत्र-अ नुसार दोन्ही प्रकरणामध्ये सहाय्यक निबंधक सह.संस्था, दिग्रस यांचेकडुन माहिती मागितली आहे त्यामुळे दोन्ही प्रकरणामध्ये आज एकत्रित सुनावणी घेण्यात आली. अर्जदार तथा अपिलकर्ता हजर आहे. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे व स्वत: जन माहिती अधिकारी म्हणुन श्री बि.डी.राठोड, सहा.निबंधक सहकारी संस्था, दिग्रस हजर आहे.

**अपील क्र.१४२३** मध्ये अर्जदार तथा अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जोडपत्र-अ नुसार दि. ३१/१/११ रोजी सहा.निबंधक, सहकारी संस्था, दिग्रस यांचेकडे अर्ज करुन ५ मुद्दयांमध्ये माहिती मागितली होती. **अपील क्र.१४२४** मध्ये अर्जदाराने जोडपत्र अ नुसार दि.७/३/११ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, दिग्रस यांचेकडे अर्ज करुन ३ मुद्दयांमध्ये माहिती मागितली होती. सदर दोन्ही प्रकरणातील प्रथम अपीलामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी ३०/१२/११ अन्वये आदेश निर्गमित केले आहेत त्यामध्ये जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक यांनी अर्जदाराला त्वरीत माहिती पुरविण्यासंबंधी आदेशीत केले होते. सदर दोन्ही अपीलामध्ये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक श्री बी.जी.जाधव यांनी अर्जदाराला माहिती पुरविली नसल्याचे सहा.निबंधक सहकारी संस्था, दिग्रस श्री राठोड यांनी सांगितले. अर्जदाराचा माहितीचा अर्ज हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(१) नुसार निकाली न काढणे, अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन न करणे यासाठी श्री जाधव, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक, सहकारी संस्था, दिग्रस यांना दोषी ठरविण्यात येते व त्यांचेविरुध्द सदर अधिनियमाचे कलम २०(२) नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येते. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द शिस्तभंगाची कारवाई

करावी व तसा अहवाल हा आदेश मिळाल्यापासुन तीन महिन्यामध्ये या आयोगास पाठवावा. तसेच सध्याचे जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांनी अर्जदाराच्या वरील दोन्ही प्रकरणामधील जोडपत्र-अ नुसार उपलब्ध असलेली मुद्देनिहाय माहिती अर्जदाराला विनाशुल्क पुरवावी व जी माहिती उपलब्ध नसेल त्यासंबंधी तसे लेखी द्यावे. सदरची कार्यवाही १५ दिवसामध्ये पुर्ण करावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

**- आदेश -**

१. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यवतमाळ यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक, सहकारी संस्था, दिग्रस यांचेविरुध्द वर शिफारस केल्यानुसार शिस्तभंगाची कारवाई करावी व तसा अहवाल हा आदेश मिळाल्यापासुन तीन महिन्यामध्ये या आयोगास पाठवावा.

२. सध्याचे जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक सहकारी संस्था, दिग्रस यांनी अर्जदाराच्या वरील *दोन्ही प्रकरणामधील जोडपत्र-अ नुसार* उपलब्ध असलेली मुद्देनिहाय माहिती अर्जदाराला विनाशुल्क पुरवावी व जी माहिती उपलब्ध नसेल त्यासंबंधी तसे लेखी द्यावे. सदरची कार्यवाही १५ दिवसामध्ये पुर्ण करावी व तसा अहवाल या आयोगास पाठवावा.

वरीलप्रमाणे अर्जदाराची दोन्ही अपीले एकत्रित निकाली काढण्यात येत आहेत.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

जिसकार/